# सावित्रीबाई फुले अध्यासन

## अहवाल : सावित्रीबाई फुले जयंती (03 जानेवारी 2025)






!! ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले !!

जोतिबांची सावित्री अर्धांगीनी !
असंख्य लेकींची यशोदेसारखी जननी !!
जोतिबांच्या समाजयज्ञातील समिधा !
तरी उमटवला तिने स्वतःचा वेगळा ठसा !!
हातात पाटीपेन्सिल असलेली साक्षात
सरस्वती !
ज्ञानदान करणारी ती 'ज्ञानगंगोत्री' !!
अशा असामान्य जननीचा जन्मदिवस !
अभिवादन करून वसा चालवू आजीवन !!

सौ. माधुरी देशपांडे

# कार्यक्रमाची रूपरेषा

- **दीपप्रज्वल व पुष्पहार अर्पण :** 10.30 am ते 10.33 am
- **कार्यक्रमाचे प्रास्ताविक :** प्रा. चेतना कामळस्कर 10.33 am ते 10.37 am
- **कार्यक्रमाच्या प्रमुख व्याख्यात्यांचे स्वागत :** 10.37 am ते 10.40 am
  1. डॉ. दिलीप धोंडगे यांचे स्वागत मा. कुलगुरू प्रा.संजीव सोनवणे सर
  2. मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांचे स्वागत प्रा. चेतना कामळस्कर
  3. मा. कुलसचिव दिलीप भरड यांचे स्वागत माधुरी देशपांडे
  4. मा. प्रा. संजीवनी महाले यांचे स्वागत मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर
- **व्याख्यान :** 10.40 am ते 10.50 am

  डॉ. दिलीप धोंडगे, प्रमुख, कुसुमाग्रज अध्यासन
  विषय: सावित्रीबाई फुले यांचे व्यक्तित्व आणि कार्य
- **अध्यक्षांचे मनोगत :** मा. प्रा. संजीव सोनावणे (मा. कुलगुरू ) 10.50 am ते 10.55 am
- **आभार :** मा. कुलसचिव 10.55 am ते 11.00 am

(स्थळ : प्रशासकीय इमारतीतील पोर्च )

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक - ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : services_dept@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230111
सेवा सुविधा कक्ष / Services Section

जा.क्र. : यचममुवि/सेवा/४१० / २०२५ दिनांक : ०२ जानेवारी २०२५

## परिपत्रक

विद्यापीठातील सर्व शिक्षक शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते कि दि.०३/०१/२०२५ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता सावित्रीबाई फुले जयंती निमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण व डॉ दिलीप धोंडगे, प्रमुख, कुसुमाग्रज अध्यासन यांचे सावित्रीबाई फुले यांच्या जीवनपटावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे, तरी सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांनी प्रशासकीय इमारतीतील पोर्च मध्ये वेळेवर उपस्थित राहावे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ज्ञानगंगा घरोघरी नाशिक-४२२ २२२

कुलसचिव

प्रत :- माहितीसाठी
१.मा.कुलगुरू यांचे कार्यालय
२.मा.प्र.कुलगुरू यांचे कार्यालय
३.प्रमुख, कुसुमाग्रज अध्यासन
4.प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन

प्रति,
१.सर्व विद्याशाखा व विभागांचे संचालक , केंद्र, कक्ष प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी, करारावरील अधिकारी व एकत्रित/दैनंदिन वेतनावरील कर्मचारी, यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
२.प्रमुख, दृकश्राव्य केंद्र — सदर कार्यक्रमासाठी माईकची व्यवस्था करणे.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

भारतातील स्त्री शिक्षणाच्या समर्थक, प्रथम स्त्री शिक्षिका, आपल्या सर्वांच्या आदरणीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन, ३ जानेवारी १८३१. महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या शैक्षणिक व सामाजिक सुधारणा चळवळीमुळे स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. स्त्रीयांच्या मुलभूत हक्कांसाठी लढणाऱ्या त्या देशातील पहिल्या पुरस्कर्त्या होत्या. त्यांच्या १९४ व्या जयंती दिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महिला सक्षमीकरणासाठी झगडणाऱ्या आणि त्याचा पाठपुरावा करणाऱ्या आजच्या सर्व महिलांसाठी हा महत्त्वाचा दिवस आहे. म्हणूनच त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा, विचारांचा जागर करण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनामार्फत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती ०३ जानेवारी २०२५, सकाळी १०.३० वा., प्रशासकीय इमारतीतील पोर्च येथे साजरी करण्यात आली.

यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमासाठी कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख, डॉ. दिलीप धोंडगे हे प्रमुख व्याख्याते म्हणुन लाभले. अध्यासनाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन अध्यासन प्रमुख प्रा.चेतना कामळस्कर यांच्या संकल्पनेतून आणि विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मा. कुलसचिव दिलीप भरड यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या मा. प्रा. संजीवनी महाले, संचालिका शिक्षणशास्त्र विद्याशाखा, वित्त अधिकारी डॉ.गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील यांच्यासह विविध विद्याशाखांचे संचालक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आदि मान्यवर उपस्थित होते. अध्यासनाच्या वतीने विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर नियुक्त झालेल्या प्रथम महिला सदस्या झाल्याबद्दल मा. प्रा. संजीवनी महाले, संचालिका शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. संजीव सोनवणे, कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते डॉ. दिलीप धोंडगे व सर्व मान्यवरांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. अध्यासन प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर यांनी प्रास्ताविकात सावित्रीबाई फुले यांचे कार्य आजच्या समस्त स्त्रीवर्गासाठी वरदान ठरले असल्याचे सांगितले.

सदर कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते डॉ. दिलीप धोंडगे त्यांच्या व्याख्यानात बोलताना म्हणाले की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य हे महात्मा फुले यांचे विचार व कार्याशी जोडून घेतले होते. किंबहुना दोन जीव एक श्वास या समर्पण व एक लक्ष ध्यासाने ती दोघे कार्य करत होती. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या केवळ समाजसुधारक, शिक्षिका नव्हत्या, तर उत्तम साहित्यिकदेखील होत्या. स्त्री-शिक्षण, विधवा पुनर्विवाह, अनाथ-बाल संगोपन, अंधश्रद्धा व अनिष्ट चालीरिती निर्मुलन याविषयीचे त्यांचे त्या काळातील कार्य हे मोठे धाडसाचे व सर्वसामान्यांना अचंबित करणारे आहे. अशा महान विभूतीचे त्यांच्या जयंतीनिमित स्मरण केल्याने आपल्यामध्ये कर्तव्यबुद्धी जागृत होत असते. सर्व महान विभूतींना काळाचे अचूक भान असते. ते सतत भविष्याचा वेध घेत प्रभावी कृती करत असतात. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले हे दाम्पत्य अशा विभूतींपैकी एक होते, ज्यांनी युगप्रवर्तक कार्य केले. असे गौरवोद्गार डॉ. दिलीप धोंडगे यांनी याप्रसंगी काढले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलताना मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की आजच्या काळातही जी समाजसुधारणा आपणास अवघड वाटते त्याची सुरवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी पावणे दोनशे वर्षापूर्वी केली होती. यावरून त्यांचे मोठेपण लक्षात यायला हवे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती तेजस्वी कदम यांनी केले, तर आभार कुलसचिव मा. दिलीप भरड यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर कार्यक्रम यशस्वीतेसाठी माधुरी देशपांडे, कविता देव, अंजली ताजनपुरे, भावना भऊरकर, डॉ. दयाराम पवार, यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच ग्रंथनिर्मिती केंद्रातील सर्व सहकारी, दृक-श्राव्य विभागातील सर्व सहकारी तसेच विज्ञान विद्याशाखेतील सर्व सहकारी यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी करता आला. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विद्याशाखेचे संचालक, प्राध्यापक, शिक्षकेतर

अधिकारी/कर्मचारी, करारावरील शिक्षक/अधिकारी/कर्मचारी, दैनंदिन वेतनावरील कर्मचारी, पी.एच.डी. /बीबीए /आयटीआय विद्यार्थी तसेच स्वच्छता /साफ सफाई विभागातील कर्मचारी महिलावर्ग आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या अहवाल संदर्भातील कार्यक्रमाची रूपरेषा, वृत्तपत्रातील प्रसिद्धी /लिंक, छायाचित्रे, उपस्थितांचे रेकॉर्ड सोबत जोडली आहेत. कार्यक्रमाचे छायाचित्र श्री राजेश बर्वे, सहायक, पीआरओ यांनी काढले, तसेच सदर लिंक वर उपलब्ध केले आहे.

डॉ. चेतना कामळस्कर
प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन

# Krantijyoti Savitribai Phule Jayanti

The birth anniversary of the respected revolutionary figure Krantijyoti Savitribai Phule, the first female teacher and a pioneer of women's education in India, is celebrated on January 3, every year. The educational and social reform movements initiated by Mahatma Jotiba Phule and Savitribai Phule laid the foundation for women's education. Today is an important day for all women who are fighting for education and advocating for their rights. Therefore, in order to awaken the spirit of Krantijyoti Savitribai Phule through the Savitribai Phule Chair of Yashwantrao Chavan Maharashtra Open University, the 194th birth anniversary of Krantijyoti Savitribai Phule is being celebrated on January 3, 2025, at 11:20 am. The event was held at the porch of the administrative building of the university.

On this occasion, the head of Kusumagraj Adhyasana, Dr. Dilip Dhondge, was the chief guest. He was honored on behalf of Adhyasana. The programme was presided over under the guidance of the Honorable Vice-Chancellor of the University, Prof. Sanjeev Sonawane and Dr. Chetana Kamlaskar, the Head of the Savitribai Phule Adhyasan, in the presence of the Registrar, Shri. Dilip Bharad. The member of the board of management, Prof. Sanjeevani Mahale, Director, School of Education, Finance Officer Dr.Govind Katlakute and Controller of Examination Bhatuprasad Patil, along with directors of various faculties, administrative officers, employees, etc., were present at this occasion. On this occasion, on behalf of Adhyasana, Hon. Prof. Sanjivani Mahale, Director, School of Education, was honored for being the first female member appointed to the University’s Board of Management.

At the beginning of the program, the Vice-Chancellor of the University, Hon. Prof. Dr. Sanjeev Sonwane, the Chief guest Dr. Dilip Dhondge, and all dignitaries paid their respects by offering flowers to Savitribai Phule's image. The head of the Savitribai Phule Adhyasan, Dr. Chetana Kamlaskar stated in her introductory remarks that Savitribai Phule's work has been a blessing for all women today.

In the main speech of the said program, Dr. Dilip Dhondge, remarked that Krantijyoti Savitribai Phule had associated her entire life with the thoughts and work of Mahatma Phule. In fact, she was working with the dedication of two lives, one breath and one focus. Krantijyoti Savitribai Phule was not only a social reformer and teacher but also a great writer. His work on women's education, widow remarriage, orphan and child care, and the eradication of superstitions and undesirable customs of that time is very daring and surprising to the common people. Remembering such a great Vibhuti on her birth anniversary awakens a sense of duty in us. All great Vibhutis have a perfect sense of time. They constantly look to the future and take effective action. Mahatma Phule and Savitribai Phule were one such couple who pioneered the era.

Speaking from the chairmanship of this program, Hon. Vice Chancellor Prof. Sanjeev Sonawane said that the social reforms that we find difficult even today were initiated by Krantijyoti Savitribai Phule and Mahatma Phule two hundred years ago. This should highlight their greatness.

The program was anchored by Mrs. Tejaswi Kadam while the vote of thanks was delivered by the Registrar, Shri. Dilip Bharad. The guidance of the Hon'ble Vice Chancellor, Prof. Sanjeev Sonawane, was instrumental in making this event successful. At the same time, Madhuri Deshpande, Kavita Dev, Anjali Tajanpure, and Bhavna Bhaurkar, Mr. Datta Patil, Dr. Dayaram Pawar, took special efforts. The cooperation of all the colleagues from Print Production Center, Audio-Visual Department, and the School of Sciences also contributed to the successful execution of the program. For this program, the Director of Schools, professors, academic coordinators, non-teaching officers/employees, contractual teachers/officers/employees, daily wage employees, Ph.D./ITI students, as well as women employees of the Sanitation/Cleaning Department, and all others were present.

The program report, along with the time schedule, press coverage/ link, photographs and attendance data (in photograph form) are all attached. The photographs of the program were taken by Mr. Rajesh Barve, Assistant, PRO.

Dr. Chetana Kamlaskar
Head, Savitribai Phule Adhyasan

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने आयोजित कार्यक्रमाची छायाचित्रे व या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले श्रोता मान्यवर














क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष व विद्यापीठाचे कुलगुरू मा.प्रा.संजीव सोनवणे सर, कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते डॉ. दिलीप धोंडगे, व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या व शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालिका प्रा. संजीवनी महाले,सावित्रीबाई बाई फुले अध्यासनाच्या प्रमुख व विज्ञान विद्याशाखेच्या संचालिका प्रा. चेतना कामळस्कर, कृषि विज्ञान शाखेच्या संचालिका डॉ.माधुरी सोनावणे,आरोग्य विज्ञान शाखेच्या संचालिका डॉ. रश्मी रानडे, व अध्यासनाच्या सदस्या सौ. माधुरी देशपांडे मॅडम आदि मान्यवर उपस्थित होते.



'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' जयंती निमित्ताने आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना सावित्रीबाई बाई फुले अध्यासनाच्या प्रमुख व विज्ञान विद्याशाखेच्या संचालिका प्रा. चेतना कामळस्कर मॅडम.





कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते डॉ. दिलीप धोंडगे यांचे स्वागत करताना सावित्रीबाई बाई फुले अध्यासनाच्या प्रमुख व विज्ञान विद्याशाखेच्या संचालिका प्रा. चेतना कामळस्कर.

व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या व शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालिका प्रा. संजीवनी महाले यांचा सत्कार करताना श्रीमती तेजस्वी कदम.






'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' जयंती निमित्ताने आयोजित कार्यक्रमाचे व्याख्यान देताना कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख व कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते डॉ. दिलीप धोंडगे.





'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' यांच्या कार्याचे काही पैलू अध्यक्षीय भाषणात उलगडताना मा.प्रा.संजीव सोनवणे सर.















'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' जयंती निमित्ताने आयोजित कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विविध विद्याशाखेचे संचालक, प्राध्यापक, शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी, करारावरील शिक्षक/अधिकारी/कर्मचारी, दैनंदिन वेतनावरील कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.



नाशिक : मुक्त विद्यापीठात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. दिलीप धोंडगे. समवेत उपस्थित कर्मचारी.

# समाजसुधारक फुले दाम्पत्य युगप्रवर्तक

**● डॉ. धोंडगे : मुक्त विद्यापीठात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन**

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

सर्व महान विभूतींना काळाचे अचूक भान असते. ते सतत भविष्याचा वेध घेत प्रभावी कृती करत असतात. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले हे दाम्पत्य अशा विभूतींपैकी एक होते, ज्यांनी युगप्रवर्तक कार्य केले, असे गौरवोद्गार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी काढले.

विद्यापीठात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले अध्यासनातर्फे आयोजित कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. डॉ. धोंडगे म्हणाले की, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी संपूर्ण आयुष्य महात्मा फुले यांचे विचार व कार्याशी जोडून घेतले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या केवळ समाजसुधारक, शिक्षिका नव्हत्या, तर उत्तम साहित्यिक होत्या. स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह, अनाथ बालसंगोपन, अंधश्रद्धा व अनिष्ट चालीरीती निर्मूलन याविषयीचे त्यांचे त्या काळातील कार्य हे मोठे धाडसाचे व अचंबित करणारे आहे. अशा महान विभूतींचे त्यांच्या जयंतीनिमित्त स्मरण केल्याने आपल्यामध्ये कर्तव्य बुद्धी जागृत होते, असेही डॉ. धोंडगे म्हणाले.

कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी अध्यक्षीय भाषणात सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. डॉ. चेतना कामळस्कर यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर नियुक्त झालेल्या प्रथम महिला सदस्या म्हणून शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका डॉ. संजीवनी महाले यांचा सावित्रीबाई फुले अध्यासनातर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी कुलसचिव दिलीप भरड, डॉ. गोविंद कतलाकुटे, भटूप्रसाद पाटील आदी उपस्थित होते. कुलसचिव दिलीप भरड यांनी आभार मानले.

Nashik Edition
Jan 05, 2025 Page No. 04

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

नाशिक आवृत्ती

YCMOU PRO DEDT
M12 050125

epaper.deshdoot.com
05 Jan 2025 - Page 12 KrantiJyoti Savitribai phule jayanti vishesh

## महान विभूतींमध्ये समान दुवा: डॉ. धोंडगे



**नाशिक ।** सर्व महान विभूतींमध्ये एक समान दुवा आढळून येतो, तो म्हणजे त्यांना काळाचे अचूक भान असते व ते सतत भविष्याचा वेध घेत असतात. त्यानुसार ते प्रभावी कृती करत असतात. महात्मा फुले व सावित्राबाई फुले हे दाम्पत्य अशा महाविभूतींपैकी एक होते. ज्यांनी युगप्रवर्तक कार्य केले असे गौरवोद्गार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी येथे काढले.

विद्यापीठात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले अध्यासनातर्फे आयोजित कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते.

यानिमित्ताने विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर नियुक्त झालेल्या प्रथम महिला सदस्या म्हणून शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका डॉ. संजीवनी महाले यांचा सावित्रीबाई फुले अध्यासनातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव श्री. दिलीप भरड वित्तअधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांच्यासह विविध विद्याशाखांचे संचालक, प्रशासकीय अधिकारी - कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, विद्यार्थी आदी उपस्थित होते. सूत्रसंचलन तेजस्वी कदम यांनी केले. आभारप्रदर्शन कुलसचिव दिलीप भरड यांनी केले.

---

पुढारी नाशिक रविवार, ५ जानेवारी २०२५ YCMOU PRO PD M4 050125



**नाशिक : मुक्त विद्यापीठात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. दिलीप धोंडगे. समवेत उपस्थित कर्मचारी.**

## समाजसुधारक फुले दाम्पत्य युगप्रवर्तक

**• डॉ. धोंडगे : मुक्त विद्यापीठात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन**

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

सर्व महान विभूतींना काळाचे अचूक भान असते. ते सतत भविष्याचा वेध घेत प्रभावी कृती करत असतात. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले हे दाम्पत्य अशा विभूतींपैकी एक होते, ज्यांनी युगप्रवर्तक कार्य केले, असे गौरवोद्गार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी काढले.

विद्यापीठात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले अध्यासनातर्फे आयोजित कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. डॉ. धोंडगे म्हणाले की, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी संपूर्ण आयुष्य महात्मा फुले यांचे विचार व कार्याशी जोडून घेतले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या केवळ समाजसुधारक, शिक्षिका नव्हत्या, तर उत्तम साहित्यिक होत्या. स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह, अनाथ बालसंगोपन, अंधश्रद्धा व अनिष्ट चालीरीती निर्मूलन याविषयीचे त्यांचे त्या काळातील कार्य हे मोठे धाडसाचे व अचंबित करणारे आहे. अशा महान विभूतींचे त्यांच्या जयंतीनिमित्त स्मरण केल्याने आपल्यामध्ये कर्तव्य बुद्धी जागृत होते, असेही डॉ. धोंडगे म्हणाले.

कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी अध्यक्षीय भाषणात सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. डॉ. चेतना कामळस्कर यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर नियुक्त झालेल्या प्रथम महिला सदस्या म्हणून शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका डॉ. संजीवनी महाले यांचा सावित्रीबाई फुले अध्यासनातर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी कुलसचिव दिलीप भरड, डॉ. गोविंद कतलाकुटे, भटूप्रसाद पाटील आदी उपस्थित होते. कुलसचिव दिलीप भरड यांनी आभार मानले.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** सर्व महान विभूतींमध्ये एक समान दुवा आढळून येतो, तो म्हणजे त्यांना काळाचे अचूक भान असते व ते सतत भविष्याचा वेध घेत असतात. त्यानुसार ते प्रभावी कृती करत असतात. महात्मा फुले व सावित्राबाई फुले हे दाम्पत्य अशा महाविभूतींपैकी एक होते. ज्यांनी युगप्रवर्तक कार्य केले, असे गौरवोद्गार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी येथे काढले. विद्यापीठात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले अध्यासनातर्फे आयोजित कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते.

यावेळी बोलताना डॉ. धोंडगे म्हणाले, की क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य हे महात्मा फुले यांचे विचार व कार्याशी जोडून घेतले होते. किंबहुना दोन जीव एक श्वास या समर्पण व एक लक्ष ध्यासाने ती दोघे कार्य करत होती. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या केवळ समाजसुधारक, शिक्षिका नव्हत्या तर उत्तम साहित्यिक देखील होत्या. स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह, अनाथ बाल संगोपन, अंधश्रद्धा व अनिष्ट चालीरीती निर्मूलन याविषयीचे त्यांचे त्या काळातील कार्य हे मोठे धाडसाचे व सर्वसामन्यास अचंबित करणारे आहे. अशा महान विभूतींचे त्यांच्या जयंतीनिमित्त स्मरण केल्याने आपल्यामध्ये कर्तव्य बुद्धी जागृत होत असते, असेही डॉ. धोंडगे याप्रसंगी म्हणाले. अध्यक्षपदावरून बोलताना कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले, की आजच्या काळातही जी समाजसुधारणा आपणास अवघड वाटते त्याची सुरुवात सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांनी पावणे दोनशे वर्षापूर्वी केली होती. यावरून आपणास त्यांचे मोठेपण लक्षात यावयास हवे, असेही ते म्हणाले. आपल्या प्रास्ताविकात सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर यांनी सावित्रीबाई फुले यांचे कार्य आजच्या समस्त स्त्रीवर्गासाठी वरदान ठरले असल्याचे सांगितले. यानिमिताने विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर नियुक्त झालेल्या प्रथम महिला सदस्या म्हणून शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका डॉ. संजीवनी महाले यांचा सावित्रीबाई फुले अध्यासनातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव दिलीप भरड, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील यांच्यासह विविध विद्याशाखांचे संचालक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, विद्यार्थी आदी उपस्थित होते. सूत्रसंचलन तेजस्वी कदम यांनी केले. आभारप्रदर्शन कुलसचिव दिलीप भरड यांनी केले.

## सावित्रीबाई फुलेअध्यासन कार्यकारी सदस्य

पुढील सदस्यांनी विविध जबाबदारी सांभाळत हा कार्यक्रम आयोजित केला:

**डॉ. चेतना कामळस्कर - अध्यासन प्रमुख**

**सौ. माधुरी देशपांडे - सदस्य**

डॉ. दयाराम पवार - सदस्य

सौ. कविता देव - सदस्य

सौ. अंजली ताजनपुरे (शिंदे) - सदस्य

सौ. भावना भऊरकर - सदस्य

श्री. दत्ता पाटील - सदस्य

डॉ. दयानंद हत्तीअंबिरे- सदस्य

श्री. सचिन शिंदे - सदस्य

**श्रीमती तेजस्वी कदम - आमंत्रित सदस्य**

**रुपाली टिक्क्ल - मदतनीस**

**------------------------ END of Document ------------------------**